Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – IV December 2015

# आजची मराठी कविता व माहिती तंत्रज्ञान

डॉ. पद्माकर तामगाडगे,
मराठी विभागप्रमुख,
सिध्दार्थ कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
मुंबई.

मराठी साहित्याला साठोत्तरी साहित्यात महत्वाचे वळण मिळाले जगातील स्थित्यंतराचा थेट परिणाम मराठी साहित्यावर दिसून आला. त्यातही मराठी कविता ही नखशिखांत पालटून गेली. जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले आणि इथला कवी हा अस्वस्थ होऊ लागला. या अस्वस्थेतूनच तो भविष्याचा वेध घेत थेट काव्यातून अभिव्यक्त होत राहिला आहे. सामाजिक, सांस्कृतिक मूल्याबरोबरच भारतीय समाजव्यवस्थेचे तटस्थपणे विश्लेषण खऱ्या अर्थाने आंबेडकरी कवितेने मांडायला सुरवात केली. डॉ. बाबासाहेबांच्या प्रेरणेने सजग झालेला समाज व त्या समाजातून शिक्षित झालेला तरुण आपल्या भावना काव्यातून प्रकट करीत राहिला. बाबुराव बागूलांपासून प्रारंभ झालेला का नव्या समाजभान असणारा व मानवी मूल्ये प्रस्थापित करायला लावणारा विचार काव्यातून यायला लागला. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, बुद्धीप्रमान्यावाद, इहवाद या दृष्टीने निर्माण झालेले हे काव्य व्यक्तीनिष्ठ व समूहनिष्ठ असे दोन्हीप्रकाराचे होते. त्यातूनच आणखी सखोलता येऊन हे काव्य धारदार व अधिक वास्तव पद्धतीने येत राहिले नामदेव ढसाळांसारख्या कवीने आपल्या जगण्याचे स्फोटक दर्शन आपल्या काव्यातून केले ती अपरिहार्यातच होती कारण पारंपरिक काव्यात त्यांची अनुभूती अभिव्यक्त करणे शक्यच नव्हते. दलित साहित्य हे उरबडवे, आक्रस्ताळी साहित्य आहे. दलित साहित्य कोंडीत सापडले आहे अशी टीका मात्र १९९० नंतर पूर्णतः निवळायला लागली. नव्वदोत्तर आंबेडकरी साहित्यात आपल्या जगण्याचे बीभत्स चित्रण लेखकांकडून फार कमी प्रमाणात व्हायला लागले. नव्या भविष्यवेध घेणाऱ्या, सामुहिकतेकडून व्यक्तिगत स्वानुभवाकडे वहिवाट करता करता वैश्विक माणूसकेन्द्री साहित्याची निर्मिती होऊ लागली. साठोत्तरी दलित साहित्यात समाजातील दलितांवरील होणारे अन्याय अत्याचाराचे स्वरूप जागतिकीकरणाच्या प्रवाहात बदलले गेले. मात्र समस्या संपुष्टात न येता अधिकच जटील होत गेल्या. वर्गीय व्यवस्था निर्माण होऊ लागली आणि आंबेडकरवादी साहित्यिकांना त्यांच्या समग्र चिंतनातून या संकटांचे वेध कळू लागले. त्यामुळेच दलित साहित्यात असणारे साहित्यातील प्रतिमाविश्व, रचनातंत्र, अभिव्यक्तीचे तंत्र यात अमुलाग्र बदल झालेत. आणि माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मराठी नव्वदोत्तर कविता आशयविश्वासह प्रतिमा-प्रतिकांनी समृद्ध व्हायला लागली त्याची नांदी जागतिकीकरणाने झाली. भांडवलवादाचे नवे रूप म्हणजेच जागतिकीकरण. 'ब्रिटानिका' कोशात जागतिकीकरण म्हणजे वस्तू,

तंत्रज्ञान आणि कल्पनांच्या विस्तारामुळे जगभरातील जीवन सारखे करणारी प्रक्रिया होय. असे सांगितले असून जागतिकीकरणाची भाषा ही इंग्रजी आहे. या स्पर्धेत इच्छा असो व नसो प्रत्येकाला सहभागी व्हावेच लागते. त्यामुळे साहित्याचीही भाषा बदलाने स्वाभाविकच म्हणावे लागते. "जागतिकीकरणात मनापासून वास्तुपर्यंत, तत्त्वज्ञानापासून राजकारणापर्यंत सारे काही बदलत जाते आणि हे सारे बदल भांडवलशाहीच्या हिताचे होतील याची काळजी घेतली जाते. आणि हे सारे बदल भांडवल्शीच्या हिताचे होतील याची काळजी घेतली जाते. माणसाची एकूण जीवनशैलीच बदलून जाते. मंदिरात जाण्याऐवजी तो ओसओन्गानाकाच्या स्क्रिनसेवरमध्ये अडकवलेल्या देवाची पूजा करायला लागतो. मोबाईलच्या वालपेपरच्या जागी भरलेल्या प्रियेच्या छायाचित्राचे चुंबन घ्यायला लागतो. मोबाईलवरूनच चुंबनाची देवाणघेवाण व्हायला लागते. माणसाच्या भावनांना असे वळण देत त्या तंत्रज्ञानावर स्थिर करण्यात भांडवल्शीला यश यायला लागते."[१] हे उत्तम कांबळे यांचे अवलोकन अत्यंत सुक्ष्मरीतीने नोंदविलेले आहे. जीवनाची तर्हा बदलली की त्याचे बदला साहित्यातून हे उमटणारच त्यातही कवी हा अत्यंत संवेदनशील असल्यामुळे त्याला भावी परिणामांची चाहूल लागते आणि तो चिंताक्रांत होतो आणि आपल्या काव्यातून भावनांची तो अभिव्यक्ती करतो. ते थेट वर्तमान-भविष्यकालीन संदर्भातील भाषेसह. असेच काव्य संभाव्य परिणामांचे संसूचन करणारे कवी नव्वदोत्तर कालखंडापासून आजपर्यंत भक्कमपणे आणि समर्थपणे वेगळया जीवनजाणिवांसहित आविष्कृत होत आहे. डॉ. यशवंत मनोहरांनी लिहिलेली कविता ही मराठी साहित्यातील पहिली ठरेल तर त्याचा विकास उत्तम कांबळे यांनी स्वतंत्र पुस्तकरूपाने मांडला आहे.

आधुनिक ज्ञान विज्ञानाचा, माहिती तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून काळाबरोबर किंबहुना काळाच्या पुढे झोकून पाहणाऱ्या काही मोजक्या कवींमध्ये अरुण काळे यांचा क्रमांक बराच वरचा लागतो. शिवाय कवींच्या कविता संग्रहाची नुसती शीर्षकसूची पहिली तरी मराठी कवितेची भाषा कशी बदलली व या जागतिकीकरणाबरोबरच माहिती तंत्रज्ञानाचा कवितेवर किती सखोल प्रभाव पडला आहे हे स्पष्टपणे जाणवते. 'मल्टी नॅशनल वॉर'(२०१२), 'जागतिकीकरणात माझी कविता'(२००६), 'रॉक गार्डन'(१९९३), 'नंतर आलेले लोक'(२००६), 'ग्लोबलचं गावकूस'(२००८), 'महासत्तेचे पिडादान'(२००५), 'चिंताक्रांत मुलुखाचे रुदन'(१९९८), 'आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून'(२००६), 'मार्शल रेस'(२००२), 'डेमोफून'(२००६), 'मकाबी'(२०१२), 'हेमलॉक'(२०१३), 'नोबल ट्रुथ'(२०१४), 'मी येणाऱ्या पिढीची दिशा घेऊन फिरतोय'(२००१), 'उत्क्रांतलेणी'(२००१) 'काजव्यांच्या खांद्यावर संगिनी'(२००२), 'ओलीस ठेवलेली माणसं'(२०१०), 'ग्लोबल वर्तमानाच्या कविता'(२००२)' ब्राव्हो! फॉक्स माइन्ड्स ऑफ कॅपिटॅलिस्ट्स'(२०१०), 'पोएम ऑफ दी ऑक्युपाय एव्हरीथिंग'(२०१२), 'सत्तेच्या आतबाहेर'(२००३), 'ब्लूप्रिंट'(२००४), 'युद्धपक्षी'(२००४), 'स्थितीचा ओला कोलाज' (२००७), 'अस्वस्थाच्या कॅनव्हासवर'(२००९), 'रस्ता सोडून चालला कुठं'(२००९), 'उन्हाच्या कटाविरुद्ध'(२०१०), 'ग्लासनोस्त'(२०११), 'झोपडी नंबर बारा'(२०१३) 'चेहरे ओरबाडलेल्या देशात'(२०१३),

'शरसंधान' (२०१३), 'अगाजा'(२०१४), 'तुरुंगातल्या कविता'(२०११) इत्यादी प्रातिनिधिक नावेही आपल्याला प्राप्त स्थितीचे बदललेले स्वरूप लक्षात आणून देण्यास पुरेसे आहे.

डॉ. नंद्कुक्म्कार मोरे आपल्या 'जागतिकीकरण आणि अरुण काळे यांची कविता' या लेखात या महाजालीय व्यवस्थेचा प्रारंभ व वास्तवस्थिती मांडतांना म्हणतात, "भारताने १९९१ साली गॅट करारावर सही केली. साधारणतः या करारानंतर भारतात खुल्या अर्थव्यवस्थेचे वारे गतिमान बनले. या करारामुळे देशातील बाजारपेठ सर्वांसाठी खुल्या झाल्या. दालन-वळण, माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा झपाट्याने विस्तार झाला. फोन, संगणक, इंटरनेट, रेडीओ, टी.व्ही.चे नवनवे च्यानल्स यामुळे माहितीचा ओघ वाढला. हवी असलेल्या माहितीबरोबरच अनावश्यक माहितीदेखील सहज आणि सर्वत्र पोहोचू लागली. या नव्या माहिती तंत्राचा वापर करून आर्थिकदृष्ट्या प्रबळ असणारे लोक स्वतःचा उद्योग व्यवसाय विस्तारू लागले. बाजारपेठेत भांडवलदारांची मक्तेदारी निर्माण झाली भारत हा लोकसंख्येने मोठा असलेला देश असल्यामुळे तो एक मोठी बाजारपेठ म्हणून जगासमोर आला. त्यामुळे जगभरातील कंपन्यांनी आपला मोर्चा भारताकडे वळवला. अनेक नव्या वस्तूंची, उत्पादनांची सवय जाणीवपूर्वक लावून त्यांची विक्री वाढवली. जाहिरातीचे प्रभावी तंत्र वापरून कोणतीही वस्तू भारतीयांच्या माथी मारली जाऊ लागली. एकूणच मुक्त अर्थव्यवस्थेच्या प्रभावाने भारतीयांच्या जीवनपद्धतीमध्ये आमुलाग्र बदल झाले."[२] हे अत्यंत सूक्ष्म अवलोकन समकालीन कवींनीही हेरले आणि भारतीय मानसिकतेच्या सखोल चिंतनातून त्यांचे काव्य आविष्कृत झाले. भारतीय समाजव्यवस्थेची चिकित्सा करता करता या नव्या जीवनव्यवहाराला इथला संवेदनशील सजग जागल्या कवी उघड्या डोळ्यांनी येणारे संकट पाहू लागला व आपल्या काव्यातून त्याचे संभाव्य संसूचन करू लागला. यात केवळ नामोल्लेख करायचेच झाले तर यशवंत मनोहर, उत्तम कांबळे, अरुण काळे, इंद्रजीत भालेराव, सुनील अभिमान अवचार, हेमंत दिवटे, महेंद्र भवरे, मंगेश नारायण काळे, लोकनाथ यशवंत, अजय कांडर, अजीम नवाज राही, वर्जेश सोलंकी, राजेंद्र गोणारकर, शिवानायान ठाकरे, बालाजी मदन इंगळे रोहन नागदिवे, अजय खडसे, गौरी भोगले, काशिनाथ वेलदोडे, महेंद्र गायकवाड, प्रमोद माने, दीपध्वज कोसोदे, नीरजा कैलास पगारे, केशव देशमुख, चंद्रकांत पोतदार, सिद्धार्थ तांबे, गंगाधर अहिरे, केतन पिंपळापुरे,आनंद गायकवाड, मंगेश बनसोड, विनोद बुरबुरे, शेषराव पिराजी धांडे, नागराज बाबुराव मंजुळे, पद्माकर तामगाडगे, नीळकंठ शेरे, अनिल कांबळे, प्रशांत वंजारे, विनोद कुमरे,कविता मोरवणकर, अनिल म्हमाणे, मनोहर जाधव, शैलेश त्रिभुवन याशिवाय आणखी बर्याच कवींनी माहिती तंत्रज्ञानाचे समाजव्यवस्थेवरील बरे वाईट परिणाम मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**ई- साहित्याची निर्मिती :**

माहिती तंत्रज्ञानाचा कालखंड जसजसा माणसाच्या वैयक्तिक आयुष्यात घुसखोरी करू लागला तसतसे साहित्य अभिव्यक्ती साधनांचेही स्वरूप बदलले गेले. सध्याचा काळ हा तंत्रज्ञानाचा असल्यामुळे स्वतःचं ब्लॉग,

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – IV December 2015

विविध ई-पुस्तके, दिवाळी अंक, विकिपीडिया, कोश सहजरीत्या जगाच्या कोणत्याही कानाकोपर्यात वाचता येते. हे स्वरूप मराठी साहित्यालाही लागू असून आज आपल्याकडे याची सुरुवात आहे. येणाऱ्या काळात त्याचे घरोघरी प्रमाण वाढेल यात शंका नाही.

**अभिव्यक्ती स्वातंत्र्य** :

अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य हे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सर्वांसाठी खुले झाले आहे. भारतीय समाजव्यवस्थेतील वर्णवर्चस्ववादी माध्यमांपासून परिवर्तनाची अपेक्षा नसलेला पुरोगामी कवी आपल्या सोशलसाईटवरून आपल्या अभिव्यक्तीचे प्रसारण स्वतःच करू शकतो. त्यामुळे नैतिकभान असलेले कवी, साहित्यक, विचारवंत आपल्या विचारांना कुणाच्याही दडपणाशिवाय सुयोग्यरित्या समाजासमोर मांडू लागला आहे.

**मराठी कवितेतील बदल :**

माहिती तंत्रज्ञानामुळे भाषा समृद्ध झाली तिचा र्‍हास झाला नाही. जागतिकीकरणाची भाषा ही इंग्रजी असल्यामुळे वैश्विक बाजार हा इंग्रजीतूनच होत असतो त्यामुळे आपापल्या भाषांना समृद्ध करण्याची धडपड ही प्रत्येक स्वभाशिकांना असते. त्यांच्या त्यांच्या भाषांचे भाषा इंजिन (TTS) आता निर्माण होऊ लागले आहे. त्यात संगणकीय भाषा संज्ञा पर्याय म्हणून कितीही योजिले तरी त्या संज्ञांना इंग्रजीतूनच प्रोग्रामिंग केले असल्यामुळे त्याच संज्ञानंचा उपयोग बहुदा केल्या जातो. यामुळे कवींच्या प्रतिमा-प्रतीकांचीही नखशिखांत आवर्तने बदललेली दिसून येते. आशयविश्वाबरोबरच नव्या संकल्पनाही मांडण्याचे धाडस या नव्या कवितेत कवी करतात. “पारंपरिक प्रतिमांना मोडीत काढून भाषिक रूपांना नवनवे अर्थ प्रदान करण्यात ही कविता यशस्वी ठरली आहे. विचारानुभवाचा सुघटीत आविष्कार आणि आशयाभिव्याक्तीच्या नाविन्यासह ही कविता दाखल झाली आहे. आशयाच्या अनुषंगाने विविध प्रतिमांचे उपयोजन झाले आहे.”[३] हे महेंद्र भवरे यांचे निरीक्षण यथोचित आहे. केतन पिंपळापुरे यांच्या कवितेतूनही ते दिसून येते -

“या ग्लोबल वर्तमानाच्या फांदीवर बसलेला
कॅपिटॅलिझम कावळा करतोय काव काव
संसदेच्या मंदिरावर घिरट्या घालतोय
मूलतत्त्ववादी गिधाडांचा वखवखलेला थवा
आणि तुझ्या बोटावरून उडालेलं
पार्लमेंट्री डेमॉक्रसीचं काबुत्तर
कंपाउंडच्या काटेरी तारेवर झालंय रक्तबंबाळ
त्याच्या चोचीतलं प्रिएम्बलचं पान कुठे झालं गहाळ”

हे या जागतिकीकरणात भांडवलवादी व मूलतत्त्ववादी प्रतीगाम्यांनी हातात हात घालून आधुनिक

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – IV December 2015

रूपातील चालवलेले शोषण अत्यंत भयावह आहे. भांडवलवादी महासत्तेच्या लोकशाहीवरील संकटांचे अत्यंत अंतर्मुख करणारे व नव्वदोत्तर काळातील शोषणाचे, अत्याचाराचे बदलले स्वरूप चपखलपणे लक्षात येईल अशी ही केतन पिंपळापुरे यांची आजची आंबेडकरवादी कविता आहे. जागतिकीकरण आणि मूलतत्त्ववाद हे हातात हात घालून वर्ण, वंश जातीचे नाव न घेता वर्गीय व्यवस्थेच्या नव्या स्वरूपाने मध्यमवर्गीय माणसांचेच शोषण करून त्याला नेस्तनाबूत करीत आहेत. जागतिकीकरणाच्या रेट्यात समूहाकडून व्यक्तिगत ध्येयाकडे स्पर्धा करायला लावणारी व्यवस्था निर्माण केली गेली असून संघटन, समूह विरोध, चळवळी आता उरल्या नाही पांढरपेशी व्यवस्थेत संवादाची माध्यमे वाढलीत मात्र संवेदना बोथट झाल्या त्यामुळे सुसंवाद होत नाहीत. सोशल मिडियावरून केले जाणारे विरोध तेवढे परिणामकारक ठरत नाही. परिणामतः इथल्या मूलतत्त्ववाद्यांचे व भांडवलवाद्यांचे चांगलेच फावते.

"फायबर ग्लासातून सायबर न्याहाळणारी नजर
नपुंसक जगावर घालते दगड
पत्थरदिल युगाच्या आधुनिक वळणावर
थबकते जाग्यावर ...."('महासत्तेचे पिंडादान' -महेंद्र भवरे)

या जगरहाटीत मात्र सामान्य माणसांचे जगणे आणि मारणेही मुश्कील होऊन जाते. जगाचे सर्व दैनंदिन व्यवहार या सामान्य माणसामुळेच चालते त्याच्यामुळेच सर्व सोयी सुविधा उपलब्ध होतात. त्याने फक्त कष्ट उपसावे, अन्याय-अत्याचार सहन करीत राहावे आणि या व्यवस्थेतील सत्ताधार्यांनी त्यांचे केवळ शोषणाच करीत राहावे असा अलिखित नियमाच सद्याच्या युगाचा झालेला आहे. त्याचे अस्तित्व उत्पादकतेपुरतेच मात्र स्वत्वहीन ही सूक्ष्म अवलोकन दृष्टी नव्वदोत्तर कवींमध्ये दिसून येते.

"क्रांतीची बीजे उगीच मूळ धरत नाही
ग्लासनोस्त-पेरेस्त्रोयकासारखी.
व्यवस्था उगीच उलथून नवे मूल्ये प्रस्थापित येत नाही.
मूल्याची जननी परिवर्तनाच्या आवर्तनात आली की,
अग्नीचा ओहाळ मस्तिष्क स्फोट घडवून
पैदा करतात पँथर्स
जगण्याची सम साधण्यासाठी."('ग्लासनोस्त'-पद्माकर तामगाडगे)

ही वैश्विक संवेदनशीलता भारतीय व्यवस्थेचे परखड व तटस्थ विश्लेषण करायला कवींना प्रवृत्त करतात. असाच प्रभाव आज भारतीय आदिवासी व स्त्रियांच्या काव्यातूनही अभिव्यक्त होतांना दिसून येतो मात्र त्याचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून येते. भुजंग मेश्राम यांच्या कवितेतून ही जाणीव स्पष्टपणे व्यक्त होत होती त्यांच्या

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – IV December 2015

काव्याची तंत्राशैली ही माहिती तंत्रज्ञानाच्या युगाला साजेशी होती त्यानंतर प्रभू राजगडकर ते थेट सद्याचे अत्यंत प्रभावी कवी विनोद कुमारे अशाच सजगतेने आपल्या काव्याप्रवसाला नवी दिशा घेऊन लिहिते झाले आहे.

एकंदरच माहिती तंत्रज्ञानाचा ओघ आता महानगरापुरता सीमित न राहता मराठी साहित्यातील सगळयाच प्रवाहांना प्रभावित करणारा ठरला आहे. अरुण काळे यांच्या 'ग्लोबलचं गावकूस' या काव्यसंग्रहाच्या शीर्षकावरूनच ते स्पष्ट होते. आता गावही छोटी छोटी नगरेच झाली आहेत. त्यामुळे माहिती तंत्रज्ञांच्या साधनांचा सर्रास वापर करून इथला माणूस हळूहळू जगाच्या स्पर्धेत सामील होण्याचा प्रयत्नही करीत आहे. मात्र याचे फायदे कमी आणि मध्यमवर्गीय व्यवस्थेतील माणसांना यातनांनाच अधिक सामोरे जावे लागतात.

**टिपा :**

१. उत्तम कांबळे, जागतिकीकरणात मराठी कविता, परचुरे प्रकाशन, मुंबई, प्र.आ. २००९, पृ. १७

२. डॉ. नंदकुमार मोरे, जागतिकीकरण आणि अरुण काळे यांची कविता, संपा. शरद गायकवाड आणि प्रा. सुनील शिंदे 'जागतिकीकरण आणि मराठी साहित्य' स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, प्रा. आ. २००९, पृ. २०६

३. डॉ. महेंद्र भवरे, 'शब्द असहाय झाले तर...', अतिरिक्त, ऑगस्ट २०१४ पृ. १४१.

GoEIIRJ